# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समिती २०२५-२६

## द्वारा: महात्मा फुले नूतन महाविद्याल मिरजगाव

ता. कर्जत जि. अहिल्यानगर ४१४४०१ इमेल:nagarzone2018@gmail.com

| सचिव | अध्यक्ष |
|---|---|
| **डॉ. राजेंद्रकुमार सुखदेव देवकाते**<br>इमेल :rsdevkate1431@gmail.com<br>मो. नं. ८८३०५४५१४१ ,९६३७१२९५९२ | **प्राचार्य डॉ. तानाजी हनुमंत जाधव**<br>इमेल: thjadhav444@gmail.com<br>मो.नं.९९२११११६५४८ |


**जा.क्र. अजिक्रीवि- १७ / २०२५-२६** **दिनांक:३१/०८/२०२५**

**<u>अत्यंत महत्वाचे</u>**

**प्रति,**

**मा. प्राचार्य / मा. संचालक,**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न अहिल्यानगर जिल्ह्यातील महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.**

**विषय: अहिल्यानगर जिल्हा आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या क्रीडा पात्रता अर्ज (Sports Eligibility) बाबतची नियमावली .**

**महोदय,**

आपणास विदित आहेच की, अहिल्यानगर जिल्हा आंतर महाविद्यालयीन महाविद्यालयीन कीडा स्पर्धाचे आयोजन केले जाते. त्यातून क्रीडाप्रकार निहाय मुला-मुलींचे स्वतंत्र असे विभागाचा संघ निवडला जातो तो संघ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतर तीन संघाबरोबर स्पर्धा खेळल्या जातात व या चारही विभगांमधून विद्यापीठाचा क्रीडाप्रकार निहाय मुला-मुलींकरिताचा स्वतंत्र संघ निवडला जातो.

वरील सर्व बाबी या पूर्णतः खेळाडू विद्यार्थी याचा आपल्या महाविद्यालय अथवा संस्थेतील विद्यापीठ नान्य अभ्यासक्रमाच्या नियमानुसार प्रवेशावर अवलंबून आहेत. तहत आपण व आपले कार्यालय तसेच महाविद्यालय/परिसंस्थेतील कीडासंचालक यांच्या सहकायनि प्रतिवर्षी हजारो खेळाडू हे अंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी होत असतात. विद्यार्थ्यांचा प्रवेश कोणत्याही कारणास्तव नजरचुकीने अथवा नियमबाह्य असा खेळाडू विद्यार्थी अथवा त्याचा महाविद्यालयाचा/विभागाचा/ विद्यापीठाचा संघ अंतर महाविद्यालयीन/अंतर विभागीय अथवा अंतर विद्यापीठ स्पर्धेतून बाद होण्याची शक्यता रहाते. ही बाब खूप गंभीर आहे.

<u>सबब आम्ही आपणास विनंती करीत आहोत की, आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थ्यांचा (विशेषतः खेळाडू विद्यार्थ्यांचा) प्रवेश निश्चित करताना विद्यापीठ शैक्षणिक पात्रता विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या परिपत्रक क्रमांक १८५/२०२५-२६ मधील प्रक्रिया तसेच नियमांचे काटेकोरपणे पालन करून होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत क्रीडापात्रता अर्ज (कंवळ क्रीडा स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूंकरिता) हे केवळ ऑनलाईन पद्धतीनेन आपल्या महाविद्यालयाच्या क्रीडासंबालकांच्या देखरेखीखाली भरणे अनीवार्य केले आहे. सदर क्रीडा पात्रता अर्ज भरत असताना पुढील बाबी</u>

कटाक्षाने तपासल्या जाव्यात, जेणेकरून पुढे भविष्यात कोणतीही तांत्रीक अडवण उद्भवण्याची शक्यता निर्माण होणार नाही.

१. विद्यार्थ्याचे प्रवेश हे विद्यापीठ शैक्षणिक पात्रता विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या परिपत्रक क्रमांक १८५/-२०२५-२६ मधील प्रक्रिया तसेच नियमांचे काटेकोरपणे पालन करूनच होणे गरजेचे आहे.

२. जर विद्यार्थी एका महाविद्यालय अथवा परिसंस्थेतील त्याचा प्रवेश रद्द करून आपल्या महाविद्यालय / परिसंस्थेत प्रवेश घेत असल्यास मागील महाविद्यालय परिसंस्थेकडील त्याचा महाविद्यालय सोडल्याचा दाखला (Transfer Certificate) व्यवस्थित असावे.

३. जर विद्यार्थी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा व्यतिरीक्त इतर विद्यापीठातून आपल्या महाविद्यालय / परिसंस्थेत प्रवेश घेत असेल तर त्याचे ट्रान्सफर सर्टीफिकेट तसेच मायग्रेशन सर्टीफिकेट असणे आवश्यक आहे.

४. भारतीय विद्यापीठ संघटना नवी दिल्ली यांच्या स्पष्ट निर्देशानुसार अंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूचे वय हे २५ वर्षापेक्षा (जन्म दिनांक ०१/०७/२००० ) जास्त नसावे (ऑनलाईन प्रणालीमध्ये अशी तरतुद केलेली आहे).

५. विद्यार्थ्यांचे पूर्ण नाव, जन्मतारीख (१० व १२ वी गुणपत्रकांबर जसे आहे तसे), आधार क्रमांक, ट्रॅकसूट व टीशर्टचे माप, क्रीडा प्रकार व त्यातील उपप्रकार (असल्यास) त्याचे नाव व्यबस्थित भरावे

६. पुर्नप्रवेशीत विद्यार्थ्यांची कागदपत्रे जसे की, चालू शैक्षणिक वर्षातील फी रीसीट, मागील परीक्षा उत्तीर्ण / अनुत्तीर्ण असल्याचे गणुपत्रक इ. बाबी असणे आवश्यक आहे.

६. आधार कार्ड तसेच इतर आवश्यक कागदपत्रे यांच्या छायांकित प्रती सुस्थितीत असणेही बंधनकारक आहे.

बरील सर्व बाबींची शहानिशा करून खेळाडू विद्यार्थ्यांचे ऑनलाईन क्रीडा पात्रता अर्ज भरावेत व संबंधित 'स्थानिक विभागीय क्रीडा समिती सचिव यांचे निर्देशानुसार अंतर महाविद्यालयीन कीडा स्पर्धेपूर्वी / दरम्यान या सर्व बाबींची पूर्तता करावी.

मा उपर जर एखादा खेळाडू हा विद्यापीठ अंतर विभागीय क्रीडा स्पर्धेत अथवा अंतर विद्यापीठ स्पर्धेत संबधितांकडून शैक्षणिक कागदपत्रे इ. च्या कारणास्तव वाद करण्यात आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही त्या महाविद्यालयाची राहील. याची कृपया नोंद घेऊन सहकार्य करावे. ऑनलाईन क्रीडा पात्रता अर्ज भरतेवेळी काही अडचण उद्भवल्यास विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर दिलेल्या ई-मेलद्वारे sportssupport@pun.unipne.ac.in अथवा विभागाच्या ई-मेलद्वारे – nagarzone2018@gmail.com आपल्या अडचणीबाबत कळवावे, संबधिताकडून त्यावर लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ दरम्यान अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभागाचे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे क्रीडा कार्यक्रम व्यवस्थित पार पडण्याकरिता आपाते. आपल्या महाविद्यालयीन शारीरिका शिक्षण संचालकांचे कार्यलयीन कर्मचारी यांचे सहकार्य नेहमीच लाभते यापुढेही लाभेल अशी अशा आहे.

आपले विश्वासू

डॉ. राजेंद्रकुमार सुखदेव देवकाते
सचिव

प्राचार्य डॉ. तानाजी हनुमंत जाधव
अध्यक्ष

अहिल्यानगर जिल्हा विभागीय क्रीडा समिती